मा०महासभा दि.२०/४/२०२१, प्रकरण क्र.०२ करिता

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. परिवहन समिती सभा दि.२६/०२/२०२१

**प्रकरण क्र. २१ :-** **नागरी वाहतूक सेवेचा (मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसचा) वापर करणाऱ्या दिव्यांगाकरीता प्रवासात सवलत देणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र.** २० **:-**

अपंग व्यक्ती (समान संधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम ४० अन्वये सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिव्यांग कल्याणासाठी ३% निधी राखून ठेवणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सद्यस्थितीत केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ हा कायदा देशभर लागू केलेला आहे. सदर कायद्याची अंमलबजावणी दि.१९/०४/२०१७ पासून देशातील सर्व राज्यभरात करण्यात येत आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ३७ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्याचा ५% निधी दिव्यांग कल्याणासाठी राखून ठेऊन विविध योजनेमध्ये दिव्यांगासाठी ५% निधी आरक्षण ठेवणेबाबत निर्देश दिलेले आहेत. या अनुषंगाने नगरविकास विभागाने दि.१० मे २०१८ च्या शासन निर्णयानुसार त्यांच्या अधिनस्त स्थानिक स्वराज्य संस्थांना ५% निधी दिव्यांग कल्याणार्थ राखून ठेवून खर्च करणेबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

नागरी वाहतुक सेवेचा वापर करणाऱ्या दिव्यांगाना प्रवासात सवलत देणे व याकरीता होणाऱ्या तोटयाची भरपाई करणेबाबत दि.२८/१०/२०१५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने नागरी वाहतुक व्यवस्थेचा वापर करणाऱ्या ४०% व त्यावरील दिव्यांग व्यक्तींना प्रवासात १००% सवलत देऊन याकरीता होणारा खर्च अपंग कल्याण योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या तरतुदीमधून करणे योग्य होईल.

तरी, नागरी वाहतुक सेवेचा (मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसचा) वापर करणाऱ्या ४०% व त्यावरील दिव्यांगाना प्रवासात १००% सवलत देणेस व सदर सवलतीच्या रक्कमेची भरपाई बस ऑपरेटर यांना अदा करणेस ही सभा मंजुरी देत आहे. सदरकामी होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती अपंग कल्याण योजनेमधून करणेस व सदर प्रतिपूर्तीची रक्कम परिवहन उपक्रमाकडे हस्तांतरीत करणेस ही सभा मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :-** श्री मंगेश पाटील

**अनुमोदक :-** श्री अविनाश जागुष्टे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सभापती**
**परिवहन समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**